रविवार, २० मार्च २०२२
# राम प्रहर
◆ वर्ष १४ ◆ अंक २४१
www.ramprahar.com
◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## जपानचे पीएम किशिदा आणि पंतप्रधान मोदींची भेट



**नवी दिल्ली :** १४व्या भारत–जपान शिखर परिषदेला उपस्थित राहण्यासाठी आलेले जपानचे पंतप्रधान फुमियो किशिदा यांनी शनिवारी (दि. १९) दिल्लीतील हैदराबाद हाऊस येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. या वेळी उभय नेत्यांमध्ये दोन्ही देशांमधील आर्थिक आणि सांस्कृतिक संबंध वाढवण्याच्या मार्गांवर चर्चा झाल्याचे सांगण्यात येते. पीएमओकडून मिळालेल्या माहितीनुसार पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फुमियो किशिदा यांच्यात अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा झाली. दोन्ही देशांमधील आर्थिक आणि सांस्कृतिक संबंधांना चालना देण्यासाठी दोन्ही नेत्यांनी चर्चा केली. ही बैठक भारत आणि जपान यांच्यात भागीदारी वाढवण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल आहे. शांतता, समृद्धी आणि प्रगतीसाठी भागीदारी केल्याचे परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

अंतरंग
सावरोली हद्दीत भीषण अपघात; दोघांचा मृत्यू/२
अर्थविषयक घडामोडींचा वेध घेणारे सदर अर्थप्रहर/४
नेरळमधील अंतर्गत रस्त्याला उद्घाटनापूर्वीच गेले तडे/५

# एमआयएमच्या प्रस्तावावर दावे-प्रतिदावे

**मुंबई : प्रतिनिधी**

**एमआयएमचे खासदार इम्तियाज जलील यांनी राष्ट्रवादी काँग्रेसला युतीची ऑफर देऊन महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात चर्चेची राळ उडवून दिली आहे. त्यानंतर राज्यातील महाविकास आघाडीत खळबळ उडाली आहे. यावरून राजकीय दावे-प्रतिदावे केले जात आहेत.**

**इम्तियाज जलील यांच्या मातोश्रींचे निधन झाले म्हणून राजेश टोपे त्यांच्याकडे गेले होते. अशा वेळी राजकीय चर्चा अभिप्रेत नाही. त्यामुळे अशा चर्चेवर प्रतिक्रिया देण्याची आवश्यकता वाटत नाही.**
**–जयंत पाटील, राष्ट्रवादी प्रदेशाध्यक्ष**

**आम्हाला कट्टरवाद मान्य नाही. सर्वधर्मसमभाव हवा आहे.**
**–बाळासाहेब थोरात, काँग्रेस नेते**

## राऊतांच्या टीकेवर जलीलांचा पलटवार

खासदार संजय राऊत यांनी शिवसेनेच्या वतीने ही ऑफर धुडकावून लावली आहे, मात्र या संदर्भात राऊतांनी केलेल्या टीकेवर एमआयएमकडून खासदार इम्तियाज जलील यांनी प्रतिहल्ला केला.

भारतात आणि महाराष्ट्रात राहणारा सर्व मुस्लीम समाज छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराजांना आदर्श मानतो. त्यांची मक्तेदारी फक्त तुमची आहे हे विसरून जा. तुम्ही शिवरायांचा उपयोग फक्त आपल्या राजकीय स्वार्थासाठी करता. औरंगजेब कोणत्या काळात होते आणि आजचा काळ काय आहे हे तुम्ही लक्षात घ्यायला हवे, असे जलील म्हणाले.

ज्या शिवसेनेचा जन्म काँग्रेसच्या विरोधात झाला होता ती शिवसेना फक्त सत्ता उपभोगण्यासाठी पुन्हा त्यांच्यासोबतच जाऊ शकते, तर तुम्ही किती खालच्या पातळीवर गेला आहात हे दिसतेय, असेही जलीलांनी म्हटले.

## तरीही जनता भाजपलाच निवडून देईल –फडणवीस

या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनीही प्रतिक्रिया दिली. या वेळी त्यांनी शिवसेनेला टोलादेखील लगावला. भाजपला हरवण्यासाठी सगळे एकत्रित येण्याचा प्रयत्न करीत आहेत, पण कोणीही एकत्र आले तरीही भारतातील जनता, महाराष्ट्रातील जनता पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या पाठीशी आहे आणि ती भाजपलाच निवडून देईल. फक्त आता या सगळ्या आघाडीमध्ये शिवसेना काय करणार? याकडे आमचे लक्ष असेल, असे फडणवीस म्हणाले.

एमआयएमला भाजपची बी टीम बोलले जात होते, परंतु आता त्यांच्याशी युती करण्याचे बोलले जात आहे. यावर बोलताना फडणवीस म्हणाले की, ते हारले की त्यांना ईव्हीएम दिसते, बी टीम दिसते. हरल्यानंतर अशा अनेक गोष्टी ते बोलत असतात. त्यांच्याकडे फार लक्ष देण्याची गरज नसते.

आम्ही पाहतो आहोत की सत्तेसाठी ते आणखी काय करतात? तसेही आता शिवसेनेने हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंऐवजी जनाब बाळासाहेब ठाकरे स्वीकारलेले आहे आणि अजानची स्पर्धा वैगरे सुरू आहे. त्याचा परिणाम आहे का पाहूयात, असे म्हणत फडणवीसांनी शिवसेनेवर निशाणा साधला.

एमआयएम जर त्यांच्याशी जोडली जात असेल तर आम्हाला काही फरकत पडत नाही. याचे कारण लोकांचा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदींवर आहे. लोक आमच्या कामाला पाहून मतदान करतात. त्यामुळे ते सर्वजण एकत्रित आले तरी आम्हाला फरक पडत नाही, असेही फडणवीस यांनी म्हटले.

## कर्जतमध्ये बैलगाडा शर्यतीत वृद्धाचा मृत्यू

**कर्जत : बातमीदार**

धुळवडीनिमित्त कर्जत तालुक्यातील उकरूळ येथे आयोजित बैलगाडा शर्यत पाहण्यासाठी आलेल्या एका वृद्ध नागरिकाचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी (दि. १८) घडली. यामध्ये बैलगाडी अंगावरून गेल्याने दौलत बाजीराव देशमुख (वय ६२, रा. चोचीचीवाडी) यांचा अंत झाला.

शर्यत सुरू असताना दुपारी अडीचच्या सुमारास एक बैलगाडी वेगाने धावत होती. त्या वेळी शर्यत पाहण्यासाठी आलेले दौलत देशमुख यांच्या डोक्याला तिची धडक बसून नंतर पायावरून चाक केले. त्यामुळे ते जमिनीवर कोसळले आणि त्यांना रक्ताची उलटी झाली. देशमुख यांना कर्जतच्या रायगड हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी नेण्यात आले. त्यानंतर तेथून पनवेल येथील पुरोहित रुग्णालयात हलविण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांचे निधन झाले.

**(सविस्तर वृत्त पान ५ वर..)**

## आज चवदार तळे क्रांती दिन सोहळा; भीमसागर उसळणार

**महाड : प्रतिनिधी**

महाड येथील ऐतिहासिक चवदार तळ्याच्या सत्याग्रहाचा वर्धापन दिन रविवारी (दि. २०) आहे. गेली दोन वर्षे कोरोनाच्या संकटामुळे हा सोहळा साजरा झाला नव्हता. त्यामुळे यंदा संपूर्ण महाराष्ट्रातून लाखो भीमसैनिक सोहळ्यास उपस्थित राहणार आहेत. विशेष म्हणजे केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री डॉ. राजेंद्रपाल गौतम व राज्यमंत्री रामदास आठवले या वेळी उपस्थित राहणार आहेत.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २० मार्च १९२७ रोजी महाडच्या चवदार तळे येथे सामाजिक क्रांती केली. तमाम दलित, शोषित, पीडित आणि तळागाळातील घटकांसाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा सार्वजनिक पाणवठ्यावर मिळावी याकरिता चवदार तळे येथे डॉ. आंबेडकरांनी सत्याग्रह केला. त्याचा वर्धापन दिन दरवर्षी महाड क्रांतीभूमीत साजरा केला जातो.

**द ग्रेट इंडियन ट्रॅव्हलने केला १९ हजारांहून जास्त किमीचा प्रवास**

## आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले कौतुक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

द ग्रेट इंडियन ट्रॅव्हलने १ डिसेंबर २०२१पासून ११ मार्च २०२२पर्यंत देशातील सर्व राज्यांचा १९ हजारपेक्षा जास्त किलोमीटरचा प्रवास केला असून नुकताच या प्रवासाचा समारोप खारघर येथे झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती लाभली. या वेळी त्यांनी या मोहिमेचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.



या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, नगरसेवक अभिमन्यू पाटील, प्रवीण पाटील, अनिता पाटील, नेत्रा पाटील, माजी नगरसेवक गुरूनाथ गायकर, जिल्हा चिटणीस गीता चौधरी आदी उपस्थित होते. **(पान २ वर..)**

## भाजप महिला मोर्चातर्फे आज हळदीकुंकू आणि चला खेळ खेळूया पैठणीचा कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक महिला दिनानिमित्त पनवेल तालुका व शहर मंडल भाजप महिला मोर्चाच्या वतीने रविवारी (दि. २०) नवीन पनवेल येथे हळदीकुंकू समारंभ आणि चला खेळ खेळूया पैठणीचा या कार्यक्रमाचे आयोजन सायंकाळी ५ वाजता करण्यात आले आहे.

नवीन पनवेलमधील श्री संत साईबाबा शाळा येथे होणाऱ्या या समारंभास प्रमुख मान्यवर म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेत्या शकुंतला ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, शहर अध्यक्ष जयंत पगडे, महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, उपमहापौर सीता पाटील, प्रदेश सदस्य व नगरसेविका दर्शना भोईर, महापालिका महिला व बालकल्याण सभापती हर्षदा उपाध्याय, प्रभाग समिती 'अ' सभापती संजना कदम, 'ब' सभापती प्रमिला पाटील, **(पान २ वर..)**



# जगभरात कोरोनाचा पुन्हा उद्रेक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

जगभरात पुन्हा एकदा कोरोनाने डोके वर काढल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. चीन, दक्षिण कोरीया, अमेरीका, ब्रिटन, इटलीसारख्या देशात मोठ्या वेगाने कोरोनाचा फैलाव पुन्हा होताना दिसत आहे. जगातील विविध ठिकाणी वेगवेगळ्या कोरोनाच्या व्हेरीयंटमुळे मोठी रुग्णवाढ होत आहे. जगभरात सध्या परिस्थिती बदलत आहे कोरोनाची चौथी लाट अनेक देशात आली असल्याचे चित्रही पाहायला मिळत आहे.

चीनमधील वुहान शहरात कोरोना विषाणू सर्वांत पहिल्यांदा आढळल्यानंतर जगभराला कोरोनाच्या भयंकर लाटेचा सामना करायला लागला. आता पुन्हा चीनच्या काही भागात कोरोना पुन्हा वाढत आहे. चीनच्या जिलिन प्रांतात राष्ट्रीय आरोग्य आयोगानुसार पुन्हा कोरोनाचा संसर्ग वाढू लागल्याचे पाहायला मिळाले. काही बाधितांचा मृत्यूही झाला. त्यामुळे दोन कोटी संख्येच्या संपूर्ण जिलिनप्रांतात कडक लॉकडाऊन लावण्यात आला आहे. दरम्यान, चीनमध्ये ज्या प्रकारे कोरोनाची रुग्णवाढ होतेय. त्याच प्रकारे दक्षिण कोरीयातदेखील होताना दिसत आहे. दक्षिण कोरीयात एका दिवसातील सर्वाधिक रुग्णवाढ बघायला मिळाली. ज्यात सहा लाख २१ हजार रुग्णसंख्या होती. जी दक्षिण कोरियाच्या एकूण लोकसंख्येच्या १.२ टक्के इतकी आहे. दुसरीकडे, अमेरिका, ब्रिटन, जर्मनी, रशियासारख्या देशात मोठ्या प्रमाणात रुग्णसंख्येत वाढ होते आहे.

जगभरात हा ओमायक्रॉनचा सब-व्हेरीयंट वेगाने पसरतोय. अशात

### चौथ्या लाटेची स्थिती



अनेक देशांतून यावर नॉन-टॉलरन्स स्टॅटर्जी वापरतलॉकडाऊनसारखे कठोर निर्णयदेखील घेतले जातायत. त्यामुळे पुन्हा एकदा त्या-त्या देशातील अर्थव्यवस्था कासवगतीने पुढे जातानाबघायला मिळत आहे. जगभरात बी-ए१ आणि बीए-२चा होणारा फैलाव अधिक तीव्र झाला आहे.

अशात ह्या नव्या व्हेरीयंटची वेगळी लक्षणे अद्यापहीसमोर आलेली नाही आहेत. मात्र, होणारे मृत्यूदेखील चिंतेचा विषय आहे. अशात लसीकरण, आणि कोविड नियमांच्या पालना पुढे काहीही पर्याय नसल्याचेदेखील दिसत आहे. अशात आलेला नवा व्हेरियंट जगावर कसा आघात करतो आणि किती हानी करतो, हे बघणे महत्त्वाचे असेल.

भारतामध्ये गेल्या दोन वर्षांपासून मर्यादित असणाऱ्या आंतरराष्ट्रीय उड्डाण सेवा पूर्ण क्षमतेने सुरू होणार आहेत. केंद्रीय हवाई मंत्रालयाने येत्या २७ मार्चपासून आंतरराष्ट्रीय विमान वाहतूक सेवा पूर्ण क्षमतेन सुरू होणार असल्याचे सांगितल आहे, पण आता जगभरात वाढणाऱ्या रुग्णांमुळे ही विमानसेवा पूर्ण क्षमतेने सुरू होणार का? हे पाहावे लागेल.

### अशी आहे रुग्णवाढ

***दक्षिण कोरियात मागील २४ तासांत चार लाख रुग्णसंख्या आढळली आहे. ब्रिटनमध्ये एका दिवसात ९० हजार नव्या कोरोनाग्रस्तांची नोंद होत मागील आठवड्यापेक्षा २४ टक्क्यांनी रुग्णसंख्या वाढली. ऑस्ट्रियात रुग्णसंख्या वाढत असल्याने मास्क घालणे बंधनकारक समोआ देशात कम्युनिटी स्प्रेड झाल्याने संपूर्ण टाळेबंदीचा निर्णय घेण्यात आला आहे. अमेरिकेत मागील २४ तासांत ३५ हजार ५९७ कोरोना रुग्ण आढळेत. चीनमध्ये मागील २४ तासांत तीन हजार ८४४ नव्या कोरोनाबाधितांची नोंद झाली आहे.***

## सावरोली गावच्या हद्दीत भीषण अपघात; दोघांचा मृत्यू

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील इसांबा फाटा ते खारपाडा रस्त्यावर सावरोली गावच्या हद्दीत वळणावर टेम्पो व मोटरसायकल यांच्यात समोरासमोर भीषण अपघात झाला. यात मोटरसायकलवरील दोघांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना सायंकाळी ५.३०च्या दरम्यान घडली. टेम्पोचालकास स्थानिक नागरिकांनी ताब्यात घेतले असून पुढील तपास खालापुर पोलीस करीत आहेत. मयत व्यक्ती हे आदिवासी समाजाचे आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, खालापूर तालुक्यातील इसांबा फाटा येथून खारपाडा रस्त्यावर सावरोली गावच्या हद्दीत गोराडिया कंपनीच्या जवळ मोटरसायकलस्वार दोघेही चौक जवळील टेंभरी गावाला जात होते. या वेळी समोरून येणाऱ्या टेम्पोची समोरा समोर भीषण टक्कर होऊन गंभीर अपघात झाला. यात मोटरसायकलस्वार गुरुनाथ पवार (वय २८) व कृष्णा कातकरी (वय ३०) दोघेही राहणार टेंभरी (चौक, खालापूर) कातकरवाडी यांचा खोपोली येथे रुग्णालयात आणतानाच अतिरक्तस्रावाने मृत्यू झाला.

अपघात घडताच परिसरातील स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी येऊन टेम्पोचालकास ताब्यात घेतले. या घटनेची नोंद खालापूर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

## पारधी समाजासाठी नवीन आधार कार्ड नोंदणी सुरू

### ▮ भाजपच्या विद्या तामखडे यांचे प्रयत्न

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे परिसरातील पारधी समाजासाठी नवीन आधार कार्ड नोंदणी सुरू करण्यात आली आहे. या कामी भाजप भटके विमुक्त महिला आघाडीच्या उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष विद्या तामखडे यांनी प्रयत्न केले आहे.

मागच्या पंधरवड्यात विद्या तामखडे यांनी पारधी समाजाच्या पालावर जाऊन त्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना कायमचा कामोठे शहरात आधार देण्याचा व आपला मतदार करण्याचा निर्धार केला. त्यानुसार त्यांच्या अडचणी समजून घेताना त्यांना आधार



आणि रेशन कार्ड नसल्याने अडचणी होत असल्याचे समजल्यावर आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पारधी समाजासाठी नवीन आधारकार्ड नोंदणी सुरुवात करण्यात आली.

या वेळी विद्या तामखडे यांच्यासोबत सामाजिक कार्यकर्ते सागर पाटील आणि प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

## सुकापूरमधील महिला जळीत प्रकरणाचा उलगडा

**पनवेल : वार्ताहर**

सुकापूरमधील बालाजी सिंपोनीमध्ये झालेल्या जळीत कांडचा खांदेश्वर पोलिसांनी छडा लावला आहे. हा सर्व प्रकार पैशाच्या मामल्यातून झाला असल्याचे निष्पन्न झाले आहे.

बालाजी सिंपोनी या रहिवाशी संकुलात रुम नं.२८०५ मध्ये सरिता महेश पताडे यांच्यासोबत गौरी शंकर केदारी राहत होते. गौरी केदारी यांनी मोहिनी धनंजय ढमढेरे यांच्याकडून सरकारी नोकरीला लावते म्हणून पैसे घेतले होते. हे पैसे वसुल करण्यासाठी मोहिनी ढमढेरे व धनंजय आंद्रे हे बालाजी सिंपोनीत गेले व गौरी हिला घाबरविण्यासाठी मोहिने हिने बाटलीत पेट्रोल व मेणबत्ती सोबत घेतली होती. रुममध्ये जाऊन गौरीकडून पैशांची मागणी करून तिला पेट्रोल आणि मेणबत्तीची भीती दाखवली. या वेळी सरिता पताडे यांनी मध्यस्ती करत गौरीला वाचविण्याचा प्रयत्न केला. या वेळी झालेल्या झटापटीत बाटलीतील पेट्रोल सरिता पताडे यांच्या अंगावर सांडून आगीचा भडका उडाला. या घटनेमध्ये सरिता पताडे पूर्णपणे भाजल्या व त्यांचा मृत्यू झाला. यानंतर मोहिनी ढमढेरे व धनंजय आंद्रे तेथून पसार झाले.

या प्रकरणाचा खांदेश्वर पोलिसांनी तपास करून मोहिनी ढमढेरे व धनंजय आंद्रे यांचा शोध घेतला व एकाला ताब्यात घेतले आहे. वरिष्ठ निरीक्षक सुभाष कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक कामत व त्यांचे पथक दुसऱ्या आरोपीचा शोध घेत आहेत.

## पनवेलमध्ये उद्या बौद्ध धम्म परिषद

### बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे महापौर डॉ. कविता चौतमोल यांचे आवाहन


**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चवदार तळे सत्याग्रह-समता दिनानिमित्त पनवेल महानगरपालिकेच्या महापौर डॉ. कविता किशोर चौतमोल व सिद्धार्थ फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि. २१) पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात 'बौद्ध धम्म परिषद'चे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेत सर्व उपासक-उपासिका यांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

महान कारूणिक तथागत सम्यक संबुद्धांनी जो सुख, शांती व दुःखमुक्तीचा मानवतावादी धम्म संपूर्ण विश्वाला दिला त्या अतुलनीय धम्माचे सर्वांना ज्ञान व्हावे या शुद्ध भावनेने बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या धम्म परिषदेला देशभरातील पू. भिक्षू-भिक्षुणी श्रामनेर श्रामनेरी व बौद्ध धम्माचे अभ्यासक उपस्थित राहून धम्मदेशना देणार आहेत. या अनुषंगाने सर्व धम्म बंधू आणि भगिनींनी आपले धम्म कर्तव्य समजून धम्म परिषदेला हजर राहून धम्म ज्ञानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी केले आहे.

सोमवारी सकाळी १०:३० वाजता धम्म ध्वजारोहण, शील ग्रहण, त्रिरत्न वंदना, परित्राण पाठ, ११:३० वाजता भिक्षु संघास भोजनदान, दुपारी १२ वाजता उपासक उपासिका भोजनदान, १:३० वाजता धम्म परिषदेचे उद्घाटन व धम्मदेशना व सायंकाळी ६ वाजता समापन (सरणतय) असे विविध कार्यक्रम होणार आहेत. या वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पू. भदंत के. आर. लामा हे असून पू. भदंत करुणानंद थेरो यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. तर पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर व पनवेल महापालिका आयुक्त गणेश देशमुख हे या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

## 'फ्रेंड्स ऑफ नेचर'ने साजरी केली अनोखी धूळवड



**उरण : बातमीदार, प्रतिनिधी**

उरण पूर्व विभागातील फ्रेंड्स ऑफ नेचर सर्पमित्र, निसर्ग संवर्धन संस्था चिरनेर यांनी शुक्रवारी (दि. १८) धुळवडीच्या दिवशी वन्यजीव आणि पक्षी यांची तहान भागविण्यासाठी चिरनेर पोंडा वनपरिक्षेत्रातील दगड मातीने भरलेला निसर्ग निर्मित झरा पुनर्जीवित करण्याचे महत्कार्य केले. वन्यजीवांची तहान भागविण्यासाठी फ्रेंड्स ऑफ नेचर संस्थेने दरवर्षी धुळवडीच्या दिवशी पाणवठा तयार करण्याचा संकल्प केला आहे. या संकल्पानुसार हा उपक्रम राबविण्यात आला.

या कार्यासाठी संस्थेचे संस्थापक जयवंत ठाकूर, अध्यक्ष राजेश पाटील, शेखर म्हात्रे, राकेश शिंदे, सृष्टी ठाकूर, अनुज पाटील, तुषार कांबळे, प्रणव गावंड, सचिन घरत आणि चरण पाटील या सर्वांनी मोलाचे योगदान दिले.

**पनवेल : भाजप नगरसेवक मुकीद काझी यांच्या निधीतून पटेल मोहल्ला येथील तलावाचे सुशोभिकरणाचे काम सुरू आहे. लवकरच या तलावाचे नवे स्वरुप बघायला मिळेल, असे नगरसेवक काझी यांनी तलावाच्या पाहणीच्या वेळी सांगितले.**



## नवी मुंबई भाजप पदाधिकाऱ्यांतर्फे आमदार मंदा म्हात्रे यांचा सत्कार

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

सीबीडी-बेलापूर से-१५ए येथे शासकीय हॉस्पिटल व मेडिकल कॉलेज उभारण्यासाठी सिडकोकडून सवलतीच्या दरात भूखंड उपलब्ध केला. वाशी येथे महाराष्ट्र भवन निर्माण करण्याकरिता चालू अर्थ संकल्पात १०० कोटी रुपयांची तरतूद करून दिली; तसेच बेलापूर जलवाहतूकीच्या वॉटर टॅक्सीचे दर कमी व्हावे याकरिता तीन वर्षांसाठी टॅक्स माफ करून दिल्याबद्दल बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांचा भाजप महिला मोर्चा व भाजप उत्तर भारतीय मोर्चातर्फे सत्कार करण्यात आला.



या वेळी भाजप महिला अध्यक्षा दुर्गा डोख, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष दत्ता घंगाळे, माजी महापौर सुषमा दंडे, उत्तर भारतीय सेलचे जिल्हाध्यक्ष राजेश राय, दिलीप तिडके, जयश्री चित्रे, विकास सोरटे, कल्पना छत्रे, सुहासिनी नायडू, जयवंत तांडेल, जगन्नाथ जगताप, ए.व्ही.नायर, शशी नायर, कल्पना शिंदे, भास्कर यमगर तसेच भाजपचे असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे म्हणाल्या की, भाजप महिला मोर्चा व उत्तर भारतीय मोर्चा यांजकडून आज जो सन्मान करण्यात आला त्यामुळे यापुढील जबाबदारी आणखी वाढली आहे. यापुढे सर्वांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा तसेच चांगली सेवा देण्याचा प्रयत्न राहणार आहे. महाराष्ट्र भवन निर्मिती करण्याचा अनेक वर्षांपासूनचा हा प्रश्न होता, त्याबाबत सातत्याने मागणी केली होती.

ज्या दिवशी भूमिपूजन होईल त्या दिवशी या प्रयत्नांचे सार्थक झाले असे समजेन. शासन दरबारी केवळ पत्रव्यवहार करून चालत नाही तर त्याबाबतचा सतत पाठपुरावा करावा लागतो, ते संपूर्ण काम पूर्णत्वास होईपर्यंत त्याबाबत पाठलाग करावा लागतो. बेलापूर मतदारसंघातील नागरिकांनी माझ्यावर जो विश्वास दाखविला आहे, तो विश्वास सार्थक करण्यासाठी मी सतत काम करीत आहे. त्यामुळे विरोधकांत असूनही सरकारला या कामाची दखल घ्यावीशी वाटते.

नवी मुंबईतील विविध प्रकल्प उभारण्यासाठी नवी मुंबई महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्याकडे १००० कोटी रुपयांच्या तरतुदींची मागणी केली होती. ते प्रकल्पही लवकरच उदयास येतील. नवी मुंबईतील भाजपा महिला मोर्चा व भाजपा कार्यकर्ते या आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळेच हे सर्व शक्य झाले असल्याचे मत आमदार मंदा म्हात्रे यांनी व्यक्त केले.

### पान १ वरून

## द ग्रेट इंडियन ट्रॅव्हलने केला १९ हजारांहून जास्त किमीचा प्रवास

द ग्रेट इंडियन ट्रॅव्हल ही १०१ दिवसांची रोड ट्रिप मोहीम होती, जी कोविडमुळे प्रभावित झालेल्या लहान आणि सूक्ष्म व्यवसायांना मदत करण्यासाठी, सर्व भारतीय राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये, भारत आणि आपली संस्कृती, परंपरा, रीतिरिवाज, पाककृती अशा विविध बाबतीत प्रेरक ठरली. या मोहिमेदरम्यान रोटरी क्लब, रोटरॅक्ट क्लब, एनजीओ क्षेत्र आणि स्टार्ट अप्स आणि लहान व्यावसायिक समुदायांसारख्या विविध आंतरराष्ट्रीय संस्थांमधील ८००पेक्षा जास्त समविचारी लोकांच्या भेटी झाल्या व त्यामध्ये एकमेकांचे विचार मांडण्यात आले.

सपोर्ट युअर बिझनेस या आशयाच्या माध्यमातून सर्व पार्श्वभूमीतील लोकांना सक्षम करणे, त्यांच्यासाठी त्यांच्या व्यवसायाचा प्रचार आणि वाढ करण्यासाठी नेटवर्क स्थापन करण्याचे ध्येय आहे जे एक नेटवर्क प्लॅटफॉर्म आहे ज्याचे नेतृत्व संस्थापक संचालक रिंकी वनमोरे, सुश्री मदीहा शेख आणि कौस्तव घोष करतात. मोहिमेचा उद्देश लहान व्यवसायांना पाठिंबा देणे आणि त्यांचे ब्रँड आणि प्रयत्न ओळखणे हा आहे. द ग्रेट इंडियन ट्रॅव्हल या मोहिमेमध्ये एक संघ असून त्यामध्ये कौस्तव घोष संस्थापक, लक्ष्मी सोरते सहसंस्थापक, आर्या नायर जनसंपर्क आणि विपणन, भाविक देशमुख नेव्हिगेटर, अनित कौर बंगा विचारवंत, संशोधन आणि विकास, रितांशू शर्मा मीटिंग समन्वयक, सावराब समता वेबसाइट विकसक, तरुण मिश्रा ग्राफिक डिझायनर-व्हिडीओ मेकर, अभिषेक वाळेकर व शीतल सिरसीकर वाहन ब्रँडिंग म्हणून काम पाहतात.

## भाजप महिला मोर्चातर्फे आज हळदीकुंकू आणि चला खेळ खेळूया पैठणीचा कार्यक्रम

'क' प्रभाग समिती सभापती अरुणा भगत, 'ड' प्रभाग समिती सभापती वृषाली वाघमारे, माजी उपमहापौर व नगरसेविका चारुशीला घरत तसेच वर्षा ठाकूर, अर्चना ठाकूर, जि. प. सदस्य रेश्मा शेळके, पं. स. सदस्य रेखा म्हात्रे, तनुजा टेंबे यांच्यासह आजी माजी नगरसेविका, पदाधिकारी, सरपंच, उपसरपंच उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचा महिलांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, शहर अध्यक्ष वर्षा नाईक यांनी केले आहे.

## नवी मुंबईतील पत्रकारांचा प्रतापगडावर अभ्यास दौरा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

जर्नालिस्ट वेलफेअर असोसिएशन, नवी मुंबईच्या वतीने एक दिवस गड-किल्ल्यांसाठी, आपला इतिहास जोपासण्यासाठी या उपक्रमांतर्गत पत्रकारांची किल्ले भेट आणि पुरातन धार्मिक स्थळांच्या भेटीचे आयोजन करण्यात आले होते.




महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचे शौर्य आणि त्यांच्या पराक्रमाची यशोगाथा सांगणाऱ्या किल्ले प्रतापगडाला भेट, त्यानंतर पुरातन श्रीक्षेत्र महाबळेश्वर, पंचगंगा देवस्थान आदींची माहिती घेत दर्शन घेतले. पाचगणी येथील भिलार गावातील देशातील पहिले अनोख्या पुस्तकांच्या गावाला पत्रकारांनी भेट दिली. किल्ले प्रतापगडाचा पराक्रमी इतिहास, सह्याद्रीच्या डोंगररांगाची अभ्यासपूर्ण माहिती आनंद उतेकर यांनी विशद केली.

जर्नालिस्ट वेलफेअर असोसिएशनचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार अशोक शेशवरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित दोन दिवसीय अभ्यास दोऱ्यात जेष्ठ पत्रकार गुरुवर्य विश्वरथ नायर यांनी संभाषणात मार्गदर्शन करताना किल्ले प्रतापगड आणि शिवकालीन इतिहास जागा केला.

सुरुवातीला नैना बिल्डर्स असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश बाविस्कर, माजी नगरसेवक अशोक गुरखे यांनी भगवा ध्वज फडकावत नवी मुंबईतील पत्रकारांना शुभेच्छा दिल्या. या अभ्यास दोऱ्यास महाबळेश्वर येथील प्रसिद्ध बिल्डर रमेश ढेबे, भगवान ढेबे यांनी मोलाचे सहकार्य केले.

### दुखवटा

## लक्ष्मी भोईर



**अलिबाग :** तालुक्यातील गोंधळपाडा येथील लक्ष्मी शांताराम भोईर (वय ८०) यांचे शुक्रवारी (दि. १८) निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, दोन मुली, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. लक्ष्मी भोईर यांचा सामाजिक कार्यात सातत्याने सहभाग राहिला. त्यांच्या दशक्रिया विधी रविवारी (दि. २७) गोकुळेश्वर तलाव येथे तर उत्तरकार्य मंगळवारी (दि. २९) घरी होणार आहे.

## सुनील भोईर



**उरण :** तालूक्यातील विंधणे गावचे शेतकरी कुटूंबातील सुपुत्र व सामाजिक कार्यकर्ते सुनील बाळकृष्ण भोईर (वय ६१) यांचे शुक्रवारी (दि. १८) निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलगे, एक मुलगी असा मोठा परिवार आहे. कै. सुनील भोईर यांचा दशक्रिया विधी रविवारी (दि. २७) नाशिक येथे होणार आहे आणि उत्तरकार्य मंगळवारी (दि. २९) विंधणे येथे होणार आहे. त्यांना श्रध्दांजली देण्यासाठी रविवारी (दि. २०) सायंकाळी ४ वाजता विंधणे येथे घरी शोकसभेचे आयोजन केले आहे. कै. सुनील भोईर यांच्या अंत्यविधीसाठी आमदार महेश बालदी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच येथील शेतकरी मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवडक

### स्कुटीच्या अपघातात चालकाचा मृत्यू

**पनवेल :** डी पॉईंटकडून जेएनपीटीकडे जाणाऱ्या रोडने पुष्पकनगर ब्रिजवर स्कुटीला पाठीमागून अज्ञात वाहनाने धडक दिली. या धडकेत सुधीर पुंडलिक पाटील (वय ४५) घेसरगाव, निळजे यांचा मृत्यू झाला आहे. अज्ञात वाहनचालकाविरोधात शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. होंडा एक्टिवा स्कूटी (एमएच ०५ एस २६०६) ही घेऊन सुधीर कुंडलिक पाटील निघाले होते. पुष्पकनगर पुलावर त्यांना पाठीमागून एका अज्ञात वाहनाने धडक दिली. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. अज्ञात वाहनचालक वाहनासह पळून गेला आहे.

### पनवेल शहरातून तरुण बेपत्ता

**पनवेल** : २१ वर्षीय तरूण राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता कुठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. नियाज युसुफ खान (वय २१), उंची पाच फूट पाच इंच, रंग निम गोरा, अंगाने मध्यम, डाव्या डोळ्याच्या भुवईजवळ जुन्या जखमेची खूण आहे. त्यांने काळी पँट व शर्ट घातलेला आहे. त्याला हिंदी भाषा अवगत आहे. या मुलाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी ०२२-२७४५२३३३ येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### अल्पवयीन मोबाइलचोर ताब्यात

**पनवेल** : एका महिलेच्या हातातील महागडा मोबाईल खेचून पसार झालेल्या अल्पवयीन मुलास पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याची कर्जत येथील बालसुधारगृहात रवानगी केली आहे. अंकिता बडे या रात्रीच्या वेळी दरबार वाईन परिसरातील रस्त्यावरून मोबाईलवर बोलत जात असताना या अल्पवयीन मुलाने त्यांच्याकडे असलेला ५० हजारांचा आयफोन लंपास केला. याबाबत तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच पोलीस पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे या आरोपीचा शोध घेतला. हा मुलगा रेल्वे स्टेशन परिसरात वावरत असल्याचे आढळून आल्याने सापळा रचून त्याला ताब्यात घेण्यात आले.

### रमेश म्हात्रे यांना पीएचडी गाईडशीप

**पनवेल** : रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले महाविद्यालयात कार्यरत असलेले ग्रामीण विकास विभागाचे



प्रमुख प्रा. डॉ. रमेश म्हात्रे यांना मुंबई विद्यापीठाने ग्रामीण विकास विषयातील पीएचडी मार्गदर्शक म्हणून नुकताच मान्यता दिली आहे. ते गेली २८ वर्षांपासून ग्रामीण विकास विषयातील अध्यापनाचे काम करीत आहेत. मुंबई विद्यापीठातील एम.ए. ग्रामीण विकास विषयाच्या विद्यापीठ परिक्षेचे चेअरमन म्हणून प्रदिर्घ काळ काम पाहिले असून ग्रामीण विकास विषयाच्या अभ्यासक्रमावर त्यांनी अनेक पुस्तकांचे लेखन केले आहे. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे त्यांना मुंबई विद्यापीठाने ग्रामीण विकास विषयातील पीएचडी गाईडशीप प्रदान केली आहे.

### 'कोमसाप'तर्फे आज महिलांचा सन्मान

**नवी मुंबई** : कोकण मराठी साहित्य परिषद नवी मुंबई शाखेच्या वतीने योगसाधिका शकुंतला निंबाळकर यांच्या स्मरणार्थ कर्तृत्ववान महिलांचा सत्कार व कविसंमेलन रविवारी (दि. २०) सायंकाळी ५ वाजता कोपसाप संस्थापक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांच्या अध्यक्षतेखाली आयोजिण्यात आले आहे. या कार्यक्रमास कोमसाप अध्यक्ष नमिता कीर, सिनेअभिनेत्री निशिगंधा वाड प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत. या वेळी विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववान महिलांना योगसाधिका शकुंतला निंबाळकर आदर्श महिला म्हणून पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे तसेच ज्येष्ठ कवी शांताराम लोखंडे यांच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलन होईल. कार्यक्रमास योगविद्या निकेतनचे विश्वस्त श्रीधर परब, अध्यक्ष महेश सिनकर, डॉ. प्रदीप ढवळ, निर्माते मुकुंद महाले आदी उपस्थित राहणार आहेत, असे मोहन भोईर यांनी सांगितले.

### रसायनीत सुरक्षा सप्ताहाची सांगता

**रसायनी, मोहोपाडा** : पाताळगंगा एमआयडीसीतील अल्कली अमाईन्स केमिकल कंपनीमध्ये सुरक्षा साप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. समारोप मंगळवारी (दि.१५) करण्यात आला. या कायक्रमासाठी रसायनीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास दादाभाऊ डोंगरे उपस्थित होते. सप्ताहादरम्यान फायर फायटींग, एसएसबीए पोस्टर्स, निबंध स्पर्धा, शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या तसेच कामगारांसाठी आरोग्य तपासणी शिबिर झाले. या वेळी विजेत्या कामगारांना पारितोषिके देण्यात आले तसेच मार्गदर्शक पुस्तिकेचे प्रकाशनही करण्यात आले.



# उरण कळंबुसरेतील भात गिरण धूळखात

## ▪ शेतकऱ्यांच्या गैरसोयीकडे सहकार विभागाचे दुर्लक्ष

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

एकीकडे केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या हितासाठी विविध उपाययोजना करीत असताना राज्यातील सरकार मात्र शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करीत आहे. राज्यातील शेती संबंधित विभाग मरगळलेल्या स्थितीत असल्याचे पहावयास मिळत आहे. अशीच एक उरण तालुक्यातील कळंबुसरे गावातील सहकारी भात गिरण पडिक अवस्थेत असल्याने येथील शेतकऱ्यांची भात भरडाईसाठी गैरसोय होत आहे.



सहकार क्षेत्राच्या माध्यमातून उरण पूर्व विभागातील चिरनेर, कळंबुसरे, मोठी जुई सह इतर गावातील नव तरुणांनी आपल्या गावातील शेतकरी आणि गरीब बांधवांना सहकार्य, आर्थिक पाठबळ मिळावा यासाठी कळंबुसरे गावात ३० वर्षांपूर्वी भात गिरणीची उभारणी केली होती, परंतु सहकार क्षेत्रातील अधिकारी आणि भात गिरणीचे भाग भांडवलदार यांनी भात भरडाई करणाऱ्या भात गिरणीकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे आज या भात गिरणीची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून ही भात गिरण धूळखात पडून राहिली आहे.

शेतकरी, गरीब बांधवांना सहकार्य, आर्थिक मदत मिळावी यासाठी शासनाने राज्यात ठिकठिकाणी सहकार क्षेत्राच्या माध्यमातून अनेक विकसित योजना राबविण्याचा संकल्प हाती घेतला. त्याचा एक भाग म्हणून उरण पूर्व विभागातील चिरनेर कळंबुसरे, मोठी जुईसह इतर गावातील कै. अनंत पाटील, यशवंत नारंगीकर, रामभाऊ केणी, दगडूशेठ राऊत, काशिनाथ पाटील यांच्यासह इतर शेतकऱ्यांनी भाग भांडवलदार, सभासदांच्या पुढाकाराने कळंबुसरे गावात भात गिरणीची उभारणी ३० वर्षांपूर्वी केली.

भात भरडाई करणाऱ्या भात गिरणीचा फायदा हा उरण पूर्व विभागातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात होत असे, पण सहकार क्षेत्रातील अधिकाऱ्यांनी व आणि भात गिरणीचे भाग भांडवलदार यांनी या भात गिरणीकडे दुर्लक्ष केल्याने आज भात गिरणीच्या परिसराची, वास्तूची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. त्यात पावसाळ्यात इमारतीवरील पत्र्याचे छप्पर उडून गेल्याने पावसाचे पाणी गिरणीवर पडून इलेक्ट्रॉनिक वस्तू नादुरुस्त झाली आहे. सहकार क्षेत्रातील अधिकाऱ्यांनी व आणि भात गिरणीचे भाग भांडवलदार यांनी पुढाकार घेऊन ही भात भरडाई करणारी भात गिरण पूर्ववत सुरू करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी उरण पूर्व विभागातील शेतकरी करत आहेत.

## भाजप नेते एकनाथ देशेकर यांच्या वाढदिवसानिमित्त आदिवासींना धान्यवाटप

### आज विविध विकासकामांचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाचे ओबीसी संघटनेचे अध्यक्ष एकनाथ देशेकर यांच्या वाढदिवसानिमित्त करंबेळी आदिवासीवाडीत शनिवारी (दि. १९) धान्याचे वाटप करण्यात आले. येथील नागरिकांनी देशेकर यांना वाढदिवसानिमित्ताने शुभेच्छा दिल्या. दरम्यान, रविवारी (दि. २०) विविध विकासकामांचे भूमिपूजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.



यासोबतच रविवारी शांतीवन येथे जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात येणार आहे. वाढदिवसानिमित्त १४ ते २० मार्चदरम्यान ई-श्रम कार्ड महानोंदणी अभियान सुरू करण्यात आले आहे.

या भागात कंपनी विभाग असून येथे ९० टक्के कामगार कंत्राटी पद्धतीने काम करीत असून असंघटित आहेत. त्या कामगारांना केंद्र सरकारच्या विविध योजनांचा लाभ घेता यावा म्हणून एकनाथ देशेकर यांनी सात दिवस ई-श्रम कार्ड महाअभियानाचे आयोजन केले आहे. असंघटित कामगारांनी या आणि ई-श्रम कार्डची नोंदणी मोफत करून घ्यावी आणि सरकारतर्फे मिळणाऱ्या कल्याणकारी योजनांचा लाभ मिळावावा, असे आवाहन एकनाथ देशेकर यांनी केले आहे. या कार्डच्या माध्यमातून गरीब जनतेला याचा फायदा घेता येणार आहे. अनेक व्यवसायांसाठी शासनाकडून आर्थिक मदत होणार आहे. देशेकर यांच्या वाढदिवसानिमित्त चिंध्रण गावातील कॉंक्रिट रस्त्याचे व अन्य विकामकामांचे भूमिपूजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या वेळी भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

## हायवेवरून टँकर २० फूट कोसळला; चालकाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

पुण्याहून मुंबईला निघालेल्या केमिकल भरलेला टँकर एक्सप्रेस हायवेवरील पनवेलजवळील नेवाळी ब्रिजजवळ आला असता रस्तासोडून २० फूट खाली कोसळल्याने टँकरचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या अपघातात चालक अरविंद यादव याला आपला जीव गमवावा लागला आहे.




या अपघातात टँकरची पुढील चाके निखळली असून बाजूला फेकली गेली आहेत. यावरून या अपघाताची भीषणता दिसून येते. चालक अरविंद यादव वय ४२ हा हाजीमलंग रोड कल्याण येथील रहिवासी आहे. अपघाताबाबत खांदेश्वर पोलीस ठाणे पनवेल येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मायनॉरिटी उर्दू कन्याशाळेत दहावीचा निरोप समारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पीपल्स ॲन्ड पेरेन्टस् असोसिएशन या संस्थेच्या मायनॉरिटी उर्दू कन्याशाळेचा इयत्ता दहावीचा निरोप समारंभ नुकताच झाला.



या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष वाहिद हुसेन शेख, उपाध्यक्ष जुबेर पिटटू, सेक्रेटरी अजीम शब्बीर मुल्ला, उर्दु कमिटीचे चेअरमन अब्दुल हमीद धुरू असलम पठाण, वहाब दाखवे, डॉ. आमीना कच्छी आदी उपस्थित होते तसेच विशेष अतिथी म्हणून हनिफ कच्छी, अब्दुलहाई शेख हे उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी दहावीच्या विद्यार्थिनींना एसएससी बोर्ड परीक्षा व जीवनाच्या पुढील वाटचालीसाठी योग्य मार्गदर्शन केले. या कार्यक्रमामध्ये मायनॉरिटी ऊर्दू कन्याशाळेच्या मुख्याध्यापिका कुदसिया प्रायमसवाला यांच्या भरीव व निस्वार्थी कार्याबद्दल दखल घेऊन हलिमाबाई झुलेवाली ट्रस्टतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षिका शहजीन पटेल, नसीरा इंडी, कौछाली उझमा व दिपाली आदींनी परिश्रम घेतले.

## गव्हाण विद्यालयात वैज्ञानिक धडे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक जाणिवा अधिक समृद्ध व्हाव्यात व अभ्यासक्रमातल्या संकल्पना अधिक सुस्पष्ट व्हाव्यात, यासाठी फिरत्या कार्यशाळेचे आयोजन पनवेल येथील सेवा सहयोग फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले.

जयश्री सानप व गणेश संसारे यांनी विद्यार्थ्यांना सायबर गुन्हा काय आहे, कसा घडतो आणि तो कसा टाळावा, याची जाणीव करून विद्यार्थी मसायबर स्मार्टफ व्हावा यासाठी विशेष मार्गदर्शन करण्यात आले. डब्ल्युएनएस कंपनीच्या वतीने प्रश्नावलींच्या माध्यमातून रेश्मा सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली काही स्वयंसेवकांनी विद्यार्थ्यांना या विषयी धडे दिले.

विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे यांनी सेवा सहयोग फाउंडेशनच्या सर्व स्वयंसेवकांचे आभार मानले. ही फिरती कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयाचे उपशिक्षक सागर रंधवे, ज्योती माळी, वृषाली म्हात्रे, रयत शिक्षण संस्थेच्या लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, योगिता पाटील, प्रसन्न ठाकूर आदींनी परिश्रम घेतले.



## तनया सावळेकर यांना पीएचडी प्रदान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतातील मानहानी आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे कायदे यावर डॉ. तनया अनिकेत सावळेकर यांनी सावित्रीबाई फुले (पुणे) विद्यापीठात प्रबंध सादर केला असून नुकतीच त्यांना पीएचडी (डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी) पदवी प्रदान करण्यात आली.



डॉ. तनया सावळेकर यांनी राष्ट्रीय विधी विद्यापीठाचे (मुंबई) कुलगुरू डॉ. दिलीप उके यांच्या मार्गदर्शनाखाली पीएचडी पूर्ण केली. डॉ. तनया यांनी सन २०१७मध्ये पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले आहे. त्यांचे स्पेशलायझेशन 'फौजदारी कायदे' आहे. त्या वास्तुविशारद अनिकेत सावळेकर यांच्या पत्नी असून माजी नगरसेवक अरविंद सावळेकर यांची स्नुषा आहे. त्यांनी त्यांची डॉक्टरेट त्यांचे वडील स्व. प्रमोद कमलाकर यांना समर्पित केली आहे.

डॉ. तनया यांचे या यशाबद्दल कौतुक होत असून अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले.

भाजपा पनवेल तालुका व शहर मंडल महिला मोर्चा

-ः सस्नेह निमंत्रण ः-

भारतीय जनता पार्टी पनवेल तालुका व शहर मंडल महिला मोर्चा यांच्यावतीने जागतिक महिला दिनानिमित्त हळदीकुंकू समारंभ व चला खेळ खेळूया पैठणीचा (आकर्षक बक्षीसे दिली जातील.लकी ड्रॉ पैठणीसाठी) कार्यक्रम **रविवार दि.२०/०३/२०२२ रोजी सायं.०५ः०० वा.श्री संत साईबाबा शाळा, नवीन पनवेल** येथे खालील मान्यवरांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात येत आहे.

तरी सदर कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे, ही विनंती.

-ः प्रमुख मान्यवर ः-

मा.लोकनेते श्री.रामशेठ ठाकूर (माजी खासदार) | मा.सौ.शकुंतला रामशेठ ठाकूर | मा.श्री.प्रशांत ठाकूर (आमदार-पनवेल)

मा. अरुणशेठ भगत (अध्यक्ष, पनवेल तालुका भाजपा)
मा.डॉ.कविता चौतमोल (महापौर, पनवेल महानगरपालिका)
मा.सौ.हर्षदा उपाध्याय (महिला बालकल्याण सभापती)
मा.ॲड.वृषाली वाघमारे (सभापती, प्रभाग समिती ड)
मा.सौ.चारूशीला घरत (नगरसेविका, पमपा)
मा.सौ.वर्षा प्रशांत ठाकूर
मा.सौ.तनुजा टेंबे (सदस्य, पनवेल पंचायत समिती)
मा.सौ.पुष्पलता कुत्तरवडे (नगरसेविका, पमपा)
मा.कु.रूचिता लोंढे (नगरसेविका, पमपा)
मा.सौ.विद्या गायकवाड (नगरसेविका, पमपा)
मा.सौ.संतोषी तुपे (नगरसेविका, पमपा)

मा. जयंत पगडे (अध्यक्ष, पनवेल शहर भाजपा)
मा.सौ.अश्विनीताई पाटील (जिल्हाध्यक्षा, उत्तर रायगड महिला मोर्चा)
मा.सौ.प्रमिला पाटील (सभापती, प्रभाग समिती ब)
मा.सौ.अरूणा भगत (सभापती, प्रभाग समिती क)
मा.सौ.रत्नप्रभा घरत (सदस्य, पनवेल पंचायत समिती)
मा.सौ.रेखा म्हात्रे (सदस्य, पनवेल पंचायत समिती)
मा.सौ.अनिता पाटील (नगरसेविका, पमपा)
मा.सौ.मोनिका महानवर (नगरसेविका पमपा)
मा.सौ.नेत्रा पाटील (नगरसेविका, पमपा)
मा.सौ.हेमलता म्हात्रे (नगरसेविका, पमपा)

मा. परेश ठाकूर (सभागृह नेते, पनवेल महापालिका)
मा.सौ.सिताताई पाटील (उपमहापौर, पमपा)
मा.सौ.संजना कदम (सभापती, प्रभाग समिती अ)
मा.सौ.दर्शना भोईर (सदस्य, महाराष्ट्र प्रदेश भाजपा व नगरसेविका)
मा.सौ.रेश्मा शेळके (सदस्या, रायगड जिल्हा परिषद)
मा.सौ.अर्चना परेश ठाकूर
मा.सौ.राजश्री वावेकर (नगरसेविका, पमपा)
मा.सौ.सुशिला घरत (सभापती, ड प्रभाग समिती)
मा.सौ.आरती नवघरे (नगरसेविका, पमपा)
मा.सौ.कुसुम म्हात्रे (नगरसेविका, पमपा)

-ः विशेष आमंत्रित ः-

मा.सौ.स्मिता वाणी (माजी नगराध्यक्षा) | मा.सौ.सुलोचना कल्याणकर (माजी नगरसेविका) | मा.सौ.सुहासिनी शिवणेकर (माजी नगरसेविका) | मा.सौ.सिद्धीका पुंजाणी (माजी नगरसेविका)
मा.सौ.कल्पना ठाकूर (माजी नगरसेविका) | मा.सौ.जैनब शेख (माजी नगरसेविका) | मा.सौ.नाझ हाफीस (माजी नगरसेविका) | मा.सौ.नलिनी शेलार (माजी नगरसेविका) | मा.सौ.वंदना बहिरा (माजी नगरसेविका)
मा.सौ.प्रमिला मुंबईकर (माजी नगरसेविका) | मा.सौ.सुनंदा पाटील (माजी नगरसेविका) | मा.सौ.मंदा भगत (माजी नगरसेविका) | मा.सौ.अलका भगत (माजी नगरसेविका)

-ः आपले नम्र ः-

सौ.रत्नप्रभा घरत (अध्यक्ष,प.ग्रा.म.मो)
सौ.निता माळी (सरचिटणीस,प.श.म.मो)
सौ.नंदा ठाकूर (चिटणीस,प.ग्रा.म.मो)
सौ.कमलाताई देशेकर (चिंध्रण सरपंच)
सौ.अंजली इनामदार (सदस्य,प.श.म.मो)
सौ.राखी पिंपळे (अध्यक्षा, खां.कॉं.म.मो)
सौ.मयुरी उन्नडकर (सदस्य प.श.म.मो)

सौ.वर्षा नाईक (अध्यक्ष,प.श.म.मो)
सौ.सुहासिनी केकाणे (उपाध्यक्ष,प.श.म.मो)
सौ.स्नेहलता ठाकूर (सदस्य,प.ग्रा.म.मो)
सौ.मनिषा निकम (कळंबोली अध्यक्ष)
सौ.मनिषा चिल्ले (सदस्य,प.श.म.मो)
सौ.निता मंजुळे (सदस्य प.श.म.मो)
सौ.ज्योती भोपी (कोषाध्यक्ष.प.ग्रा.म.मो)

सौ.प्रतिभा भोईर (सरचिटणीस,प.ग्रा.म.मो)
सौ.समिना साठी (उपाध्यक्ष,प.ग्रा.म.मो)
सौ.इंदूमती पाटील (ता.चिटणीस,सदस्य ग्रा.प)
सौ.वनिता पाटील (कामोठे म.अध्यक्ष)
सौ.मनिषा बहिरा (सदस्य,प.रा.म.मो)
सौ.अक्षया चितळे (सदस्य प.श.म.मो)
सौ.सारिका म्हात्रे

सौ.लीना पाटील (सरचिटणीस,प.ग्रा.म.मो)
सौ.अनुसया घरत (उपाध्यक्ष,प.ग्रा.म.मो)
श्रीमती राजश्री म्हसकर (नेरे सरपंच)
सौ.स्नेहल खरे (सदस्य,प.श.मंडल)
सौ.इंदूमती म्हात्रे (ता.चिटणीस)
सौ.वनिता पाटील (खारघर म.अध्यक्ष)
सौ.शिल्पा म्हात्रे (चिटणीस,प.ग्रा.म.मो)


सौ.सपना पाटील (सरचिटणीस,प.श.म.मो)
सौ.अदिती मराठे (कोषाध्यक्ष,प.श.म.मो)
सौ.रंजना पाटील (वाकडी सरपंच)
सौ.आशा बोरसे (त.फेज म.अध्यक्ष)
सौ.मनिषा घरत
सौ.ज्योती देशमाने (सदस्य,प.श.म.मो)
सौ.योगिता भगत (उलवेनोड अध्यक्ष)
सौ.मनिषा घरत (चिटणीस,प.ग्रा.म.मो)

सर्व आजी माजी सरपंच, उपसरपंच, नगरसेविका, सदस्या, महिला पदाधिकारी आणि कार्यकर्त्या

# निवृत्ती काळातील सुरक्षिततेसाठी आता हवा नव्या पर्यायांचा शोध

**भविष्य निर्वाह निधीचे व्याजदर कमी झाल्यामुळे आता निवृत्त नोकरदार काय करणार, अशी होणारी चर्चा ही साहजिकच असली तरी व्याजदर कमी होण्याचा हा प्रवाह असाच चालू राहणार हे लक्षात ठेवून निवृत्तीच्या काळातील आर्थिक गरजांचा आता वेगळ्या पद्धतीने विचार करण्याची वेळ आली आहे. 'एनपीएस'मध्ये सहभाग आणि नव्या गुंतवणुकीचे मार्ग स्वीकारणे हा आता त्यावरील खरा मार्ग आहे.**


अर्थ प्रहर



यमाजी मालकर
(ymalkar@gmail.com)



भविष्य निर्वाह निधीचे व्याजदर ८.५ टक्क्यांवरून ८.१ टक्का करण्याची शिफारस या निधीच्या विश्वस्तांनी अलीकडेच केली. ज्यांना भविष्य निर्वाह निधीचा लाभ मिळतो असे देशात सुमारे सहा कोटी ४० लाख नोकरदार आहेत. नव्वदीच्या दशकात हे व्याजदर १२ टक्के होते ते आता ८.१ टक्का होऊ घातले आहेत. देशात बँकिंग वाढत असल्याने बँकमनी वाढत चालला आहे आणि तो कमी व्याजदरात उपलब्ध झाला तरच कर्ज घेणाऱ्यांची संख्या वाढणार आहे. त्यामुळे बँकांचे व्याजदर गेली काही वर्षे कमी होत आहेत आणि यापुढे हा प्रवाह असाच राहणार आहे. त्याचाच परिणाम म्हणजे भविष्य निर्वाह निधीचे व्याजदर कमी करण्याची विश्वस्तांनी केलेली शिफारस होय. असे करण्यास अनेकांचा विरोध आहे.विरोध आणखी वाढला तर सरकार व्याजदर आहे तेच ठेवण्याचा निर्णय घेईल, मात्र या शिफारशींचा अर्थ असा आहे की आता निवृत्तीसाठी केवळ भविष्य निर्वाह निधीवर अवलंबून रहाता कामा नये.



**व्याजदराचे बदलते गणित**

आधी व्याजदराचे हे बदलते गणित समजून घेतले पाहिजे. जेव्हा बँकेत पुरेसा पैसा येत नाही, तेव्हा बँका अधिक व्याज देऊन नागरिकांना बँकेत पैसा ठेवण्यास प्रोत्साहन देतात. अशा वेळी बँका त्यापेक्षा दीड ते दोन टक्के अधिक व्याज लावून पतपुरवठा करतात. म्हणजे जेव्हा बँक ठेवींवर १० ते १२ टक्के व्याजदर मिळत होते, तेव्हा बँका १२ ते १४ टक्के व्याजदराने कर्ज देत होत्या. याचा अर्थ नागरिक घर बांधण्यासाठी, विकत घेण्यासाठीही याच व्याजदराने कर्ज घेत होते आणि तरुण व्यावसायिकांना तर यापेक्षा अधिक व्याजदराने कर्ज घेऊन उद्योग व्यवसाय उभे करावे लागत होते. इतक्या व्याजदराने बँकेचे कर्ज मिळत असेल तर त्या देशात नवनिर्मितीला मर्यादा येतात. त्यामुळेच त्या वेळीही आणि आजही सर्वाधिक व्याजदर असणारी मोठी अर्थव्यवस्था अशीच भारताची ओळख राहिली आहे. याचा अर्थ जगासोबत राहण्यासाठी बँकिंग वाढून बँकमनी आणखी वाढण्याची गरज आहे, पण हा बदल एकतर्फी होऊ शकत नाही. बँकेचे व्याजदर जर कमी झाले तर ठेवींचेही होतात आणि कर्जाचेही होतात, पण ज्यांनी बँक ठेवींवर विसंबून आपल्या निवृत्तीचे नियोजन केले आहे त्यांचे काय होणार? त्यांनी काय करायचे? सरकारने त्यात हस्तक्षेप करून ज्येष्ठ नागरिकांच्या ठेवींवर अधिक व्याज मिळत राहील अशी व्यवस्था केली आहे, पण अशी व्यवस्था किती दिवस चालेल हे सांगता येणार नाही.

**'त्या' नऊ कोटी ज्येष्ठांचे काय?**

वरील उदाहरणात जे बँक ठेवींचे होते आहे तेच सध्या भविष्य निर्वाह निधीवरील व्याजाचे होते आहे. व्याजदर चढे ठेवून कोणत्याच देशाची प्रगती झालेली नाही. त्यामुळे व्याजकमी होण्याचा कालखंड आपल्याही देशात आला आहे हे मान्य करून किमान तरुण पिढीने भविष्य निर्वाह निधीवर विसंबून राहण्यापेक्षा निवृत्तीसाठी इतर मार्गांची जोड दिली पाहिजे. व्याजदरातील हा बदल केवळ सहा कोटी ४० लाख नोकरदारांचा आहे. वास्तविक देशातील ज्येष्ठ नागरिकांची संख्या आता १५ कोटींच्या घरात पोहचली आहे. याचा अर्थ उर्वरित नऊ कोटी नागरिकांच्या निवृत्तीच्या काळातील आर्थिक गरजांचाही विचार सरकारला आज ना उद्या करावाच लागणार आहे. अगदी संघटीत नोकरदारांना व्यवस्था ज्या सोयी सवलती देते तेवढ्या सर्व नऊ कोटी नागरिकांना देता येणार नाहीत, पण त्यांच्या मुलभूत गरजा भागविण्यापुरते तरी सरकारला द्यावेच लागणार आहे. या प्रवासात भविष्य निर्वाह निधीचे व्याजदर खाली येत रहातील हे ठरलेले आहे. येथे एक लक्षात घेतले पाहिजे की आपल्या कुटुंबात जी तरुण पिढी आहे त्यांना व्याजदर कमी होण्याचा फायदा होणार आहे आणि त्यांना नव्या जगात काही करण्यासाठीची ती एक अपरिहार्य बाब असणार आहे.



**नोकरदार आणि सर्वांसाठी नवे पर्याय**

आता प्रश्न असा पडतो की मग भविष्य निर्वाह निधीवर विसंबून राहिलेल्या नोकरदारांनी नेमके काय करावयाचे? त्यांना पुढील काही पर्याय आहेत. १. राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (एनपीएस) ही खास निवृत्ती काळातील आर्थिक गरजांसाठीच सुरू केलेली आहे. महत्त्वाचे म्हणजे तिच्यात भाग घेण्यासाठी तुम्ही सरकारी किंवा खासगी नोकरदार असण्याची गरज नाही. कोणीही भारतीय नागरिक तिचा लाभ घेऊ शकतो. शिवाय तिच्या माध्यमातून मिळणारा परतावा भविष्य निर्वाह निधीपेक्षा चांगला आहे. तिच्याप्रमुख योजनांमध्ये आज किमान परतावा १२ टक्के मिळतो आहे. त्यामुळे जे आता मध्यम वयात आहेत त्यांनी भविष्य निर्वाह निधीसोबत एनपीएसमध्येही भाग घेतला पाहिजे. एनपीएसमध्ये भाग घेणाऱ्या नागरिकांची संख्या वाढत चाललीच आहे. सध्या एनपीएसचे पाच कोटी ७२ लाख सदस्य (फेब्रुवारी २०२२ अखेर) आहेत. याचा अर्थ पुढील दोन तीन वर्षांत ही संख्या भविष्य निर्वाह निधीच्या सदस्यांइतकीच होईल. २. भविष्य निर्वाह निधीची रक्कम ज्यांनी अलीकडेच काढली आहे आणि ज्यांना अजिबात जोखीम घ्यायची नाही अशांनी ती ज्येष्ठ नागरिकांसाठीच्या बँक ठेवींमध्ये ठेवली पाहिजे. ज्यात इतरांपेक्षा अधिक व्याज मिळण्याची तरतूद आहे. २. जे आर्थिकदृष्ट्या अधिक साक्षर आहेत अशांनी निवृत्तीनंतर मिळालेलाकाही निधी आपली जोखीम घेण्याची क्षमता लक्षात घेऊन म्युच्युअल फंडामध्ये गुंतविला पाहिजे. ३. जे तरुण आहेत त्यांनी गुंतवणुकीचे नवे मार्ग शक्य तितक्या लवकर समजून घेऊन शेअर बाजार किंवा म्युच्युअल फंडाच्या मार्गाने शेअर बाजाराच्या गुंतवणुकीचा पर्याय निवडला पाहिजे. शिवाय तरुणपणीच टर्म इन्शुरन्स आणि आरोग्य विमा काढला पाहिजे.


---

# मल्टीबॅगर शोधला खरा, पण सांभाळला का?

**आपल्या अभ्यासाबद्दल प्रचंड खात्री व केलेली गुंतवणूक सांभाळून ठेवण्याचं धैर्य ज्याच्याकडे आहे त्याला बाजारात मल्टिबॅगर्सचा शोध घेणे अवघड नाही. कोणते आहेत अशा मल्टिबॅगर्सचे निकष?**



प्रसाद ल. भावे
sharpadvisers@gmail.com





शेअर बाजारात मल्टीबॅगर शोधण्यासाठी अनेक निकष वापरले जातात, पण फार कमी गुंतवणूकदारांना त्याचे फायदे पदरात पडतात. कारण एकदा असा शेअर शोधला की तो वर्षानुवर्षे पोर्टफोलिओमध्ये ठेवण्याचा संयम बहुतेकांकडे नसतो. त्यामुळे एकदा भविष्य उज्वल असलेली कंपनी शोधली की तिला बाजारातील चढउतारात सांभाळण्याची तयारी असली पाहिजे.

शेअरबाजारात मल्टिबॅगर्स शोधण्याआधी सर्वप्रथम आपली मानसिकता बदलणं गरजेचं आहे. कारण मल्टिबॅगर्स हे एखाद दोन वर्षांत ठरत नाहीत, तर त्यासाठी बराच संयम ठेवावा लागतो. अशा चांगल्या कंपन्यांच्या शेअर्सचे भाव वर्षोनुवर्षे तसेच पडून असतात आणि मग आपण जर त्यात गुंतवणूक केली असेल तर इतर शेअर्स वाढताना पाहून आपल्याला वाटते की आपण घेतलेल्या शेअर्समध्ये काही दम नाही आणि आपण ते किरकोळ नफ्यात विकून टाकतो आणि काही वर्षांनी आपणास पश्चात्ताप होतो.

अनेक वेळा काही गुंतवणूकदार असे चांगल्या कंपन्यांचे शेअर्स नाकारतात आणि कमी किमतीच्या शेअरकडं त्यांचा कल असतो, परंतु इथं आपण स्वतःचीच फसगत करत असतो. शेअरचा भाव कमी म्हणजे तो शेअर स्वस्त असं कधीच नसतं. याउलट उत्तम कंपन्यांचे शेअर्स हे थोडे महागच असतात, कारण प्रत्येकाची नजर अशाच कंपन्यांवर असते. उदा. बाजारानं तळ गाठला होता तेव्हा म्हणजे मार्च २०२०च्या अखेरीस व्होडाफोन आयडिया या प्रसिद्ध कंपनीच्या शेअरचा भाव होता रुपये १८, जो त्याच एका महिन्यात निम्मा झाला होता म्हणून लोकांनी स्वस्त मिळतोय म्हणून खरेदी केला व आज संपूर्ण बाजार त्या तुलनेत वर आलाय, मात्र व्होडाफोन आयडियाच्या शेअरचा भाव आहे रुपये १०.२५ म्हणजे अजून अर्धा. समजा त्या वेळी या कंपनीचे शंभर शेअर्स खरेदी करण्याऐवजी त्याच १८०० रुपयांमध्ये

यासाठी अजून एक उदाहरण पाहू. मार्च २००० साली एमआरएफ या प्रसिद्ध टायर कंपनीचा एक शेअर ६००० रुपयांना होता. जर त्या वेळेस कोणासही या एका शेअरमध्ये गुंतवणूक करावयास सांगितलं असतं, तर सहा हजार रुपये गुंतवून केवळ एकच



सर्वांच्या परिचयाच्या अशा टाटा कंझ्युमर प्रॉडक्ट्सचे आठ शेअर्स आले असते व त्याच आठ शेअर्सचं मूल्य आज रुपये सहा हजार असलं असतं. त्यामुळं कमी किंमतीचे फुटकळ (पेनी) शेअर्स भविष्यात भरीव परतावा देऊ शकतात, तर जास्त किंमत असणारा शेअर जास्त परतावा देऊ शकत नाही हा गैरसमज साफ चुकीचा आहे.

शेअर घेतला असं नको म्हणून कोणी नवख्या गुंतवणूकदारानं याकडं दुर्लक्ष केलं असतं, परंतु बरोबर दहा वर्षांनी याच एका शेअरचा भाव ६०००वरून ७३०००वर पोहचलेला दिसून येतो. म्हणजे दहापट फायदा. याच उलट त्याच सुमारास रिलायन्स कम्युनिकेशनच्या एका शेअरचा भाव होता रुपये १७३ व आज इतक्यावर्षांनंतर भाव आहे केवळ रुपये ३ म्हणजे ९९% नुकसान. तशीच कथा जॉकी या ब्रॅण्डच्या विजार बनवणाऱ्या पेज इंडस्ट्रीज कंपनीची ८०० रुपयांवरून ४२०००. वरवर पाहता विचार केल्यास विजार बनवणाऱ्या कंपनीत कोणी गुंतवणूक केलेली असल्यास काय परतावा अपेक्षित ठेवू शकतो हे ज्याचं त्यानं ठरवावं, परंतु अशा कंपन्यांचं लपलेले मूल्य बाजारास माहीत झाल्यावरच त्यावर गुंतवणूकदारांच्या उड्या पडणार आणि तेथूनच मल्टिबॅगर्सचा खरा प्रवास चालू होणार, मात्र त्यासाठी आपल्या अभ्यासाबद्दल प्रचंड खात्री व केलेली गुंतवणूक सांभाळून ठेवण्याचं धैर्य असणं आवश्यक आहे.

ज्या क्षेत्रामध्ये वाढीसाठी खूप वाव असतो अशा उद्योगधंद्यांमध्ये अशा कंपन्या आपण शोधू शकतो ज्यामध्ये चांगली मूलतत्त्वे, उत्तम व्यवस्थापन, चांगला कॉर्पोरेट गव्हर्नन्स, कमी प्रमाणात असलेले भाग-भांडवल, शून्य अथवा कमी कर्ज, प्रवर्तकांची जास्त हिस्सेदारी आणि उत्तम दीर्घकाळ चालू शकणारं एखादं अन्य उत्पादन अशा गोष्टी त्या कंपनीचं सक्षमीकरण करू शकतात. त्यातील सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे भविष्यातील कमाईची वाढ.

सर्वप्रथम असं क्षेत्र निवडणं गरजेचं आहे की ज्यामध्ये पुढील पाच ते दहा वर्ष खूप प्रगती साधण्यास वाव आहे, खासकरून नवीन क्षेत्रं. उदा. आयटी आणि त्यासंबंधी कंपन्या.

**कमीत कमी कर्ज**

कमीत कमी कर्जं असल्यास ती फेडावयासाठी लागणारी रक्कम व कर्जापोटी व्याज भरपाईची रक्कम तितकीच लहान व म्हणून नफ्याचं मार्जिन जास्त.

**स्पर्धात्मक फायदा**

सरासरीपेक्षा जास्त नफा मिळवण्याबरोबरच कंपनीची तिची स्थिरता देखील तितकीच महत्त्वाची आहे. उच्च नफा वाढीमागील घटक तितकेच महत्त्वाचे आणि हे घटक जोपासणाऱ्या बाबींची क्षमता व्यापक हवी. त्याचबरोबरीनं अडीअडचणीच्या दिवसांत कंपनीकडं अशा विषम परिस्थितीत तग धरून ठेवण्याची क्षमतादेखील हवी.

बाजारातील मोठा हिस्सा संपादन करणारा तगडा ब्रँड, कमी उत्पादन व इतर खर्च आणि एक अद्वितीय उत्पादन श्रेणी या गोष्टींच्या मदतीनं कंपनी इतर कंपन्यांपेक्षा स्पर्धात्मक फायद्याचा लाभ घेऊ शकते.

अर्थातच बाजार पडताना केलेला अशा कंपन्यांचा शोध आपल्याला गुंतवणुकीची नवी उर्मी देऊन जातो हे नक्की.

---

## अर्थसाक्षर स्पर्धा : १२
### निकाल पुढीलप्रमाणे

**प्रश्न क्र. १. देशात या उन्हाळ्यात एका आठवड्याला इतक्या देशांतर्गत विमानांचे उड्डाण होणार आहे.**
**उत्तर : आ.** २५ हजारांपेक्षा अधिक

**प्रश्न क्र. २. भारतातील सध्याच्या एकूण विमानतळांची संख्या किती आहे?**
**उत्तर : अ.** ११२

**प्रश्न क्र. ३. महाराष्ट्रातील कोणत्या विमानतळावरून या आठवड्यात विमानसेवा सुरू होणार आहे?**
**उत्तर : ई.** गोंदिया

अर्थसाक्षर स्पर्धा १२च्या प्रश्नांना एकाही स्पर्धकाने बरोबर उत्तर दिलेले नाही. त्यामुळे अर्थसाक्षर स्पर्धा १२साठी एकही विजेता नाही.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : १३

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).

**१. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी फेब्रुवारी २०१९ पासून देशातील किती शेतकरी कुटुंबांना मिळतो आहे?**
**अ.)** १२ कोटी **ब.)** ५ कोटी **क.)** ८ कोटी **ड.)** १० कोटी

**२. भारतीय पासपोर्टधारक जगातील किती देशांना आता व्हिसाशिवाय भेट देऊ शकतात?**
**अ.)** ५९ देश **ब.)** ४० देश **क.)** ३० देश **ड.)** १० देश

**३. आधार कार्डधारक नागरिकांची संख्या सध्या (फेब्रुवारी२०२२) किती आहे?**
**अ.)** १४० कोटी **ब.)** १२० कोटी **क.)** १३२ कोटी **ड.)** १०० कोटी




**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

# परीक्षा काळात वीज घालवू नका

## मुरूड भाजपचे महावितरणला निवेदन



**मुरूड : प्रतिनिधी**

सध्या इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरू आहेत, परंतु मुरुड महावितरणकडून मंगळवारी व अन्य दिवशीसुद्धा वीज घालवण्यात येते. एकतर मुरूड तालुक्यात ३८ डिग्री सेल्सियसचे तापमान असून विद्यार्थी व नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. भारतीय जनता पक्षातर्फे विद्यार्थ्यांच्या वतीने मुरुड महावितरणचे उपमुख्य कार्यकारी अभियंता महादेव दातीर यांना निवेदन देण्यात आले.

या वेळी मुरुड तालुका भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष महेंद्र चौलकर, ज्येष्ठ नेते आण्णा कंधारे, तालुका उपाध्यक्ष बाळा भगत, मुरूड तालुका अल्पसंख्याक अध्यक्ष हनीफ उलडे, संघटन सरचिटणीस प्रवीण बैकर आदी उपस्थित होते.

या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, या परीक्षा कालावधीत एखाद्या व्यक्तीचे वीज बिल थकले असेल, परंतु त्याचा मुलगा किंवा मुलगी दहावी किंवा बारावीला असेल तर अश्या वेळी मुलांच्या भविष्याचा विचार करून जोपर्यंत परीक्षा संपत नाही तोपर्यंत त्याचा वीजपुरवठा खंडित करू नये. वीज खंडित केल्याने मुलांच्या अभ्यासावर त्याचा परिणाम होणार आहे. मंगळवारी लोडशेडिंगच्या नावाखाली सात ते आठ तास वीज घालवली जाते हे योग्य नाही. परीक्षा कालावधीत वीज घालवलेली भारतीय जनता पक्ष कधीही सहन करणार नाही. लोकांच्या मागण्यावरून आम्ही तुम्हाला निवेदन देत असून लोकांचा गांभीर्यपूर्वक विचार करावा, अशी मागणी भाजपतर्फे करण्यात आली.

या निवेदनाला उत्तर देताना मुरूड महावितरणचे उपमुख्य कार्यकारी अभियंता महादेव दातीर यांनी सकारात्मक प्रतिसाद देत लोकांच्या या मागणीचा विचार करणार असून शक्यतो परीक्षा कालावधीत वीज जाणार नाही याची काळजी घेणार असल्याचे सांगितले.

# नेरळ कुंभारआळी येथील रस्त्याला उद्घाटनापूर्वीच तडे

**कर्जत : बातमीदार**



नेरळ ममदापुर संकुल प्राधिकरणमधील नेरळ ग्रामपंचायत हद्दीमधील कुंभारआले भागातील रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण दोन महिन्यापूर्वी करण्यात आले होते, मात्र दोन महिन्यांत या रस्त्याला भेगा पडल्या असून या रस्त्याचे पालकमंत्री रविवारी उदघाटन केले जाणार आहे. दरम्यान, नेरळ प्राधिकरणाचा निधी लाटण्यासाठीच आहे काय, असा प्रश्न समोर आला आहे.

रायगड जिल्हा परिषदेच्या नेरळ संकुल विकास प्राधिकरण मधून नेरळ, ममदापुर आणि कोल्हारे ग्रामपंचायत हद्दीमधील विकास कामे होत असतात. याच प्राधिकरणाच्या निधीमधून नेरळ ग्रामपंचायत हद्दीमधील कुंभारआळी भागातील रस्त्याचे काम केले आहे. कुंभारआळी येथील मुख्य रस्ता ते पी. दि. गायकवाड चौक आणि पुढे वाघरे यांच्या घरापर्यंत हा रस्ता जातो. या रस्त्यावर सिमेंट काँक्रीटीकरण आणि काही भागात पेव्हर ब्लॉक टाकण्याचे काम मंजूर होते. मागील दिड ते दोन महिन्यांपूर्वी या रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. या रस्त्यासाठी रायगड जिल्हा परिषदेच्या नेरळ प्राधिकरणाच्या निधीमधून साधारण ४० लाखाचा निधी खर्च केला आहे, मात्र हा रस्ता उद्घाटन होण्याआधीच खराब झाला आहे. त्यामुळे उद्घाटनापूर्वी खराब झालेल्या रस्त्याच्या कामाचे उद्घाटन पालकमंत्री करणार काय? याबद्दल कुतूहल निर्माण झाले असून नेरळ विकास प्राधिकरणमधील कामे अशाच पद्धतीने होतात काय? असा सवाल उपस्थित होत आहे.

## आदिवासी कुटुंबांना शासकीय दाखल्यांचे वाटप

**मुरूड : प्रतिनिधी**



कातकरी उत्थान कार्यक्रमांतर्गत मुरूड तालुक्यांतील नांदगाव मंडळामधील दांडा, नागेश्वरनगर आदिवासी वाड्यांवरील ६० व्यक्तींची विनामुल्य वैद्यकिय तपासणी करून औषधोपचारही करण्यात आले. या वेळी आदिवासी कुटुंबीयांना विविध शासकीय दाखल्यांचे वाटप करण्यात आले.

आदिवासी बांधवांनी शिक्षणाची कास धरावी. शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन या वेळी मुरूडचे तहसीलदार रोहन शिंदे यांनी उपस्थितांना केले.

या शिबिरात १० आदिवासी बांधवांना जातीचे प्रमाणपत्र वितरित करण्यात आले तसेच १७ आदिवासी कुटूंबांना शिधापत्रिका तर २४ लाभार्थ्यांना रहिवासी दाखल्याची प्रत देण्यात आली. या वेळी ६० महिला, पुरुष तसेच बालकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.

मुरूडचे नायब तहसीलदार गोविंद कोटिंबे, नांदगाव ग्रामपंचायत सरपंच वैशाली पवार, उपसरपंच अस्लम, ग्रा. पं. सदस्य विलास सुर्वे, भाजप तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर, वैद्यकीय अधिकारी कबले, तलाठी विहुर वरदा मयेकर यांच्यासह आरोग्य पथक, नांदगाव मंडळ अधिकारीव तलाठी आणि आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अलिबागमध्ये महिलांसाठी कार्यशाळा

**अलिबाग : प्रतिनिधी**

भंडारी बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने अलिबागमधील श्री. विठ्ठल रखुमाई देवस्थान सभागृहात सोमवारी एकदिवसीय मोफत कार्यशाळा घेण्यात आली. महिला सबलीकरण अंतर्गत घेण्यात आलेल्या कार्यशाळेत ५३ महिलांनी सहभाग नोंदवला. त्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.

प्रशिक्षक ज्योती मयेकर यांनी कार्यशाळेत फ्लॉवर मेकिंग, क्राफ्ट मेकिंग तर प्रशिक्षक श्वेता म्हात्रे यांनी केक मेकिंग कोर्स उत्तमरित्या शिकवले. हर्षदा मयेकर यांनी वस्तू औद्योगिक दृष्टीने कशा बनवायच्या, त्याला मार्केट कसे मिळवायचे, विक्रीबाबत महत्वाच्या टिप्स दिल्या. नगरसेविका संजना संदीप कीर यांनीही या वेळी मार्गदर्शन केले.

कार्यशाळेचे सूत्रसंचालन पूनम रांजणकर यांनी केले. संस्थेच्या प्रेरणा गुळेकर, वैशाली बांदिवडेकर, सुवर्णा पारकर, रुचिता पालशेतकर, मनिषा पाटील, दुर्वा पारकर इत्यादी पदाधिकाऱ्यांनी कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. त्यांना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दर्शन पारकर, सचिव अक्षय गुळेकर, कार्यकारणी सदस्य विलास आंब्रे यांनी सहकार्य केले.



## बैलगाडा शर्यतीत अपघात; वृद्धाचा मृत्यू

**कर्जत : बातमीदार**



कर्जत तालुक्यातील उकरूळ येथे बैलगाडा शर्यतीचे आयोजन केले होते. धुळवडची सुटी असल्याने आयोजित शर्यतीत दुपारी तालुक्यातील चोचीचीवाडी येथील शर्यतीचे शौकीन दौलत बाजीराव देशमुख यांचे बैलगाडी अंगावरून गेल्याने झालेल्या अपघातात निधन झाले.

कर्जत तालुक्यातील उकरूळ येथे उल्हासनदीच्या बाजूला असलेल्या माळरानावर बैलगाडा शर्यतीचे आयोजन १८ मार्च रोजी केले होते. बैलगाडीची जोडी वेगाने धावत असताना शर्यत पाहण्यासाठी आलेले तालुक्यातील चोचीचीवाडी येथील गृहस्थाच्या आधी डोक्याला धडक देऊन आणि नंतर पायावरून बैलगाडीचे चाक केले. दौलत बाजीराव देशमुख यांना वेगाने शर्यत करणाऱ्या बैलगाडीचे लाकडी जुकाड लागले आणि त्यानंतर त्यांच्या पायावरून बैलगाडीचे चाक गेले. त्याचवेळी खाली जमिनीवर कोसळलेल्या दौलत देशमुख यांच्या तोंडातून रक्ताची उलटी झाली.

हा अपघात मुख्य व्यासपीठापासून ६०० मीटर अंतरावर अपघात झाला आणि त्याची माहिती तात्काळ आयोजक यांना देण्यात आली, मात्र जखमी दौलत देशमुख–वय ६२ यांना तेथून उचलून बाजूला सावलीत नेऊन ठेवण्यात आले आणि त्यांना तत्काळ रुग्णालयात नेण्याची खबरदारी न घेता तिकडे आयोजकांकडून बैलगाडी शर्यतीचा धुरळा सुरूच होता. अपघात घडल्यानंतर पाऊण तासाने दौलत देशमुख यांना दीड किलोमीटर अंतरावरील रायगड हॉस्पिटल येथे उपचारासाठी नेण्यात आले. सव्वातीन वाजण्याच्या देशमुख यांच्या नातेवाईक यांनी त्यांना रायगड हॉस्पिटल येथून पनवेल येथील पुरोहित रुग्णालयात हलविण्यासाठी धावपळ सुरू केली. पुरोहित रुग्णालयात उपचार सुरू केल्यानंतर डोक्याला गंभीर जखमा असल्याने आणि मोठ्या प्रमाणावर रक्तस्त्राव झाल्याने साडे सहा वाजता दौलत देशमुख यांचे निधन झाले.

या घटनेची नोंद पनवेल पोलिसांनी घेतली असून दौलत देशमुख यांच्या पार्थिवाचे शव विच्छेदन पनवेल येथील ग्रामीण रुग्णालयात करण्यात आले, दौलत देशमुख यांच्या अंत्यसंस्कार कार्याला शर्यतीचे आयोजक पोहचले नव्हते, असा आरोप मयत दौलत देशमुख यांच्या नातेवाइकांनी केला आहे.

# पोलादपूर तालुक्यात ग्रामदैवतांचा शिमगोत्सव उत्साहात

## श्री काळभैरवनाथ, जोगेश्वरी, रवळनाथाची पालखी सहाणेवर

**पोलादपूर : प्रतिनिधी**



(छाया : शैलेश पालकर)

ग्रामदैवत श्रीकाळभैरवनाथ, श्रीजोगेश्वरीमाता आणि श्रीरवळनाथांचे पालखीतून भैरवनाथनगर सहाणेवर आगमन होताच पोलादपूर शहरात मोठ्या जल्लोषात ग्रामदैवतांचा शिमगोत्सव सुरू झाला. गुरुवारी रात्री देवस्थानचे सरपंच बाबूराव महाडीक यांच्या हस्ते होळीची पूजा करून पुरणपोळीचा नैवेद्य अर्पण करून होळी प्रज्वलनाने खऱ्या अर्थाने शिमगोत्सवाची रंगत द्विगुणित झाली. या वेळी असंख्य महिला, पुरुष भाविकांनी ग्रामदैवतांचे दर्शन आणि होळीचे दहन यासाठी आवर्जून उपस्थिती दर्शवून भक्तीभाव जोपासला.

गुरुवारी सकाळी समशेर सोनार तसेच सुंदरशेठ पालकर सोनार या सेवेकऱ्यांच्या वंशजांकडे ग्रामदैवतांची चांदीची रूपं सेवेला आल्यानंतर पालखीमध्ये देव अलंकारांनी सजवून सायंकाळी पालखीचे आगमन भैरवनाथनगर सहाणेवर खालूबाजाच्या निनादात झाले. या वेळी मोठ्या आकाराचे दगडाचे गोटे अंगावर लिलया खेळविणे तसेच सासनकाठी नाचविणे यासोबतच खालूबाजाच्या तालावर फेर धरून नाचण्यात तल्लीन होण्यात भाविकांनी धन्यता मानली. भाविकांनी दिलेल्या लाकूडफाट्यासह गवत आणि पालापाचोळ्याची होळीच्या मैदानात योग्य मांडणी करण्यासाठीचा थरार आणि शेकडो हातांनी रचलेली होळी याचे दर्शनही या वेळी झाले. या रचलेल्या होळीची श्रीकाळभैरवनाथ देवस्थानचे सरपंच बाबूराव महाडीक यांच्या हस्ते आरती करण्यात आल्यानंतर होळीचा होम पेटविण्यात आला. होळीत श्रध्देने टाकलेले नारळ पेटत्या होमातून काढण्याचे कसब या वेळी अनेक तरूणांनी दाखविले.

रंगपंचमीपूर्वी रात्री ग्रामदेवतांचा भंडारा होणार असून रंगपंचमीला पहाटे ग्रामप्रदक्षिणेला ग्रामदैवतांची पालखी निघणार आहे. पोलादपूर शहरात देवांच्या पालखीसोबत रंगपंचमीला सुरूवात होत असते.

## रोह्यात पर्यावरणपूरक होळी

**रोहे : प्रतिनिधी**

कोकण एज्युकेशन सोसायटीच्या रोहे येथील डॉ. चिंतामणराव देशमुख वाणिज्य व सौ. कुसुमताई ताम्हाणे कला महाविद्यालयात नुकताच सामाजिक वनीकरण विभाग रोहा, महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय हरितसेना यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरणपूरक होळी साजरी करण्यात आली.

राष्ट्रीय सेवा योजनेच रायगड जिल्हा समन्वयक प्रा. तुळशीदास मोकल यांनी पर्यावरणपूरक होळी साजरी का करावी, याबाबत माहिती दिली. होळी हा सण महत्वाचा आहे, पण या सणाच्या आनंदासाठी आपण वृक्षतोड न करता पालापाचोळा वापरून पर्यावरणपूरक होळी साजरी करावी, असे आवाहन सामाजिक वनीकरण विभागाचे रोहा वनपाल दिलीप वाघे यांनी केले.

पर्यावरणपूरक होळीचा उपक्रम नेटाने यशस्वी करा, त्यात आपल्या बरोबर इतरांचाही सहभाग वाढवा व ही चळवळ व्यापक बनवा, असे प्रतिपादन प्राचार्य, डॉ. अतुल साळुंके यांनी या वेळी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अनंत थोरात यांनी केले. वनरक्षक धिरेश विठोबा थळकर यांच्या प्रमुख उपस्थिती संपन्न झाला. प्रा. सीमा भोसले यांनी आभार मानले.

## परहूर येथे आज शेतकरी मेळावा

**पाली : प्रतिनिधी**

शेतकरीवर्गासाठी महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाच्या वतीने रविवारी (दि. २०) श्री समर्थ कृपा वृद्धाश्रम परहूर येथे अलिबाग (रायगड) दुपारी २ वाजता शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. ही माहिती महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी केले आहे.

मेळाव्यात आंबा भाजीपाला पिकावरील रोगांच्या प्रादुर्भाव व प्रभावी उपाययोजना, रसायनमुक्त कृषी फलोत्पादन, शेतकऱ्यांसाठी असलेल्या राज्य व केंद्र शासनाच्या योजना आदी विषयांवर तज्ञाचे मार्गदर्शन होणार आहे.

या कार्यक्रमास कृषी सहसंचालक कोकण एस. आर. पाटील, कृषी अधिकारी दत्तात्रेय काळभोर, कर्जत कृषी संशोधन केंद्राचे सहयोगी संचालक डॉ. एस. बी. भगत, रायगड आत्मा कृषी उपसंचालक सतीश बोराडे, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक ज. आर. मुरकुटे, महाराष्ट्र कृषी फलोत्पादन मंडळाचे निर्यात सल्लागार गोविंद हांडे, सेंद्रीय कृषी अभयान आयुक्तालय पुणेचे समन्वयक, सुनील चौधरी आदी उपस्थित असतील. फलोत्पादन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करण्यांना सन्मानित करण्यात येणार आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे चिखले, ता. पनवेल, जि. रायगड येथील **श्री. सुरेश विठ्ठल चौधरी** यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, खुद्द स्वरुपाची खालील वर्णनाची शेत जमीन आमचे अशिलांनी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**

**मौजे–चिखले, तालुका–पनवेल, जिल्हा–रायगड**

| सर्व्हे नं./गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| २६ | १ | १–५०–०० | २५.८२ |

सबब वर नमुद शेतजमिन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाच्याही कोणत्याही प्रकारच्या हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, अॅटचमेंट, लीज एम.ओ.यू. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून **२१ दिवसाच्या आत** हक्क हितसंबंधाचे स्वरुप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमूद मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : १९/०३/२०२२

**सही/–**

अॅड. श्री. अमोल शंकर साखरे

शॉप नं. १२८, नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.

मो. ८६५२२३३७७१/९३२४३७२१६६


# सुधागड, मुरूडमध्ये बच्चेकंपनीसह वृद्ध महिला व पुरुषही रंगात गेले न्हाऊन

**पाली : प्रतिनिधी**

(छाया : धम्मशील सावंत)





कोरोनामुळे सलग दोन वर्षे कोणताही सण व उत्सव मनासारखा साजरा करता येत नव्हता. मात्र यंदा होळी व रंगपंचमीचा सण रंगाची उधळण करीत सर्वत्र उत्साहात व धुमधडाक्यात साजरा करण्यात आला. पालीत 'बुरा मत मानो होली है,' म्हणत बच्चेकंपनीसह वृद्ध महिला व पुरुष रंगात न्हाऊन गेले होते.

रायगड जिल्ह्यात कोरोना रुग्णांची संख्या घटली आहे, जिल्हा प्रशासनाने निर्बंधदेखील शिथिल केलेत. त्यामुळे यावर्षी धुळवड सणाचा साऱ्यांनी मनमुराद आनंद लुटला. पालीसह सुधागड तालुक्यात होळी व धुळवड सण पारंपरिक पद्धतीने व धुमधडाक्यात साजरा करण्यात आला. गुरुवारी रात्री होळीची विधीवत पुजा करण्यात आली. या वेळी पारंपारीक वाद्य वाजवीत तर काही ठिकाणी होळीचे गाणे बोलत होळी भोवती प्रदक्षिणा घालण्यात आली.

होळीच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे शुक्रवारी धुलिवंदन किंवा धूळवड खेळली जाते. सुधागडात धुळवड धुमधडाक्यात साजरा करण्यात आली.



(छाया : संजय करडे)

**मुरूड : प्रतिनिधी**

शहर व ग्रामीण भागात गुरुवारी होळी सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळपासूनच ठिकठिकाणच्या कार्यकर्त्यांनी होळीसाठी लाकडे जमविली होती. सुपारीच्या झाडाचे विधिवत पूजन करून अनेक लोकांनी या वृक्षाला मिरवणुकीने होळीच्या जागेवर आणले आणि तेथे उभे केले. मध्यरात्रीच्या सुमारास त्याची यथसांग पुजा करून होळी करण्यात आली. ग्रामीण भागात ग्रामस्थांनी खालूबाजाच्या तालावर सुपारी झाडाला नाचवत व आकाशात भिरकावत मिरवणुका काढल्या होत्या. होळी हा कोळी समाजाचा आवडता सण असून यंदा या सणाचा उत्साह कोळी समाजामध्ये कायम दिसून आला. मुरूड शहरातील कोळीवाडा परिसरात होळी पेटवल्यावर तिच्या भोवती नृत्य करून कोळी बांधवांनी एकमेकांना शुभेच्छा दिल्या. नवीन कपडे व पारंपरिक वेशभूषेने कोळीवाडे सजले होते.

मुरूड शहरातील विविध भागातील होळीचे पुरोहिताच्या हस्ते विधिवत पूजा करून दहन करण्यात आले. शहरातील बाजरपेठ तरुण मित्रमंडळाच्या होळीच्या पूजेचा मान या वेळी डॉ. मयूर राज कल्याणी व भाविका कल्याणी यांना मिळाला. त्यांच्या हस्ते पूजा केल्यानंतर होळीचे दहन करण्यात आले. यावेळी अनेक लोक उपस्थित होते.




अहमदनगर : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष आणि रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत यांनी चिंचोडी येथील न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाला शनिवारी सदिच्छा भेट दिली. या वेळी त्यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या शाळेला जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन आणि 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी देणगी दिलेली आहे.


























दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com